दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज



# मागासवर्गीय मुला, मुलींसाठी शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेशाची प्रक्रिया सुरू

**नागपूर** ■ दिलीप येवले

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाद्वारे मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी चालविण्यात येणारी शासकीय वसतिगृहे, शासकीय निवासी शाळा सुरू करण्यात आल्या आहेत. सामाजिक न्याय विभागांतर्गत नागपुर जिल्ह्यात शहरातील मागावर्गीय मुला/मुलींची एकुण १४ वसतिगृहे तसेच तालुका स्तरावरील मागासवर्गीय मुला/मुलीचे एकुण ११ शासकीय वसतिगृह आहेत. यात उमरेड, कुही (मुलांचे), कुही (मुलींचे), वानाडोंगरी (मुलांचे व मुलींचे), नांदा ता. कामठी (मुलांचे), पारशिवनी (मुलांचे), काटोल (मुलींचे), रामटेक (मुलीचे), कळमेश्वर (मुलींचे), सावनेर (मुलींचे) अशा एकुण २५ शासकीय वसतिगृहांद्वारे विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. सन २०२४- २५ या शैक्षणिक सत्राकरीता शालेय व कनिष्ठ महाविद्यालयीन अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकरीता मोफत प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे. गरजू व पात्र विद्यार्थी-विद्यार्थिनींकडून यासाठी अर्ज आमंत्रित करण्यात आली आहेत.

सन 2024-25 या सत्रातील शालेय व कनिष्ठ महाविद्यालयीन अभ्यासक्रमातील रिक्त जागा

| एकुण वसतिगृह संख्या | अभ्यासक्रम | SC | मांग | मेहतर | ST | VJNT | SBC | OBC/ EBC | अपंग | अनाथ | खास बाब | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शालेय | १४३ | १३ | १५ | ४ | ६ | ६ | ८ | ६ | ७ | ३६ | २४४ |
| | कनिष्ठ महाविद्यालय | १६६ | २२ | ३१ | १४ | १३ | १२ | १४ | १७ | १३ | ४० | ३४२ |
| | व्यवसायिक | १६८ | ५८ | ७१ | १८ | १९ | ६ | २१ | २२ | ११ | ६७ | ४६१ |
| २५ | बिगर व्यवसायिक | ११९ | १५ | २१ | ७ | १३ | ३ | १० | ८ | ६ | २८ | २३० |
| | एकुण | ५९६ | १०८ | १३८ | ४३ | ५१ | २७ | ५३ | ५३ | ३७ | १६८ | १२७७ |

**वसतिगृहाच्या गृहपालांकडे व क्यूआर कोड स्कॅनद्वारा ऑनलाईन अर्ज उपलब्ध**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, मांग/मेहतर, भंगी, इतर मागासवर्गीय, विशेष मागासप्रवर्गासह इतर प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ही सुविधा आहे. सद्यस्थितीत इयत्ता आठवी व कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सन २०२४-२५ या सत्रासाठी वसतिगृहामध्ये रिक्त असणाऱ्या जागेवर विनामूल्य प्रवेश ऑफलाईन पद्धतीने देण्यात येत आहे. यासाठी लागणारा अर्जाचा नमुना विद्यार्थ्यांना क्युआर कोडद्वारे स्कॅन करुन घेता येईल. याचबरोबर प्रत्येक वसतीगृहाच्या गृहपालाकडे अर्ज उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. सदर अर्ज आवश्यक ते कागदपत्र जोडून संबंधित तालुक्याच्या वसतिगृहातील गृहपालाकडे सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहायक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित ग्रहपाल अथवा सहायक आयुक्त समाज कल्याण विभागाशी संपर्क विद्यार्थांना साधता येईल.

सन २०२४-२५ या सत्रातील शालेय व कनिष्ठ महाविद्यालयीन अभ्यासक्रमातील रिक्त जागेकरीता ज्या इच्छुक विद्यार्थी, विद्यार्थीनींना शासकीय वसतिगृहात प्रवेश घ्यावयाचा आहे अशा गरजू विद्यार्थ्यांनी नागपूर शहरातील सामाजिक न्याय विभागांतर्गत मुलींचे एकुण ६ शासकीय वसतिगृहे व मुलांचे एकुण ८ शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी शहराच्या केंद्रभागी असलेल्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, वसंतनगर, चोखामेळा परिसर, दिक्षाभुमी चौक, नागपूर येथून विनामुल्य अर्ज प्राप्त करून निर्धारित मुदतीत संपुर्ण आवश्यक कागदपत्रांसह सादर करावा. तसेच वसतिगृह प्रवेश अर्ज खालीलप्रमाणे दिलेल्या कोड वरून देखील उपलब्ध करून घेऊन आवश्यक कागदपत्रांसह वसतिगृहात सादर करू शकता. तसेच ग्रामीण भागातील तालुका स्तरावरील एकुण ११ वसतिगृहांत प्रवेशाकरीता संबंधित तालुक्याच्या वसतिगृहातील गृहपाल यांच्याकडून इच्छुकांना अर्ज प्राप्त करून घेता येतील.

पात्र विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित तालुक्याच्या वसतिगृहातील गृहपाल यांचेकडे अर्ज सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे. अधिक माहीतीसाठी संबंधित शासकीय वसतिगृहाचे गृहपाल किंवा सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण नागपूर या कार्यालयाशी संपर्क करावा, असे स्पष्ट केले आहे. शासकीय वसतिगृहात निवास व भोजनासह अंथरूण- पांघरूण, शैक्षणिक साहित्य, पुस्तके, निर्वाह भत्ता, ग्रंथालय, जिम, ई-लायब्ररी व इंटरनेट वाय-फाय आदी सुविधा विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येतात.